| **Headline:** NSE brings about positive changes in life of Katkari Tribes | |
|---|---|
| **Source:** Pudhari | **Date:** 4 November 2017 |

# कातकरी-आदिवासींच्या जीवनात नवचैतन्य

## एनएसईच्या उपक्रमातून सकारात्मक बदल : मुलांच्या सुप्त प्रतिभांना चालना

**सातारा : प्रतिनिधी**

नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. (एनएसई) ने साताऱ्यातील कातकरी आदिवासी जनसमुहाच्या जीवनात सकारात्मक बदलासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आपल्या अभिनव सामाजिक दायित्व उपक्रमांच्या माध्यमातून एनएसई येथील कातकरी आदिवासींच्या मुलांसाठी शैक्षणिक प्रकल्प राबवत आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी सातारा जिल्ह्यातील आठ आदिवासी पाडे आणि आठ ग्रामीण क्षेत्रांमध्ये अखिल भारतीय स्थानिक स्वराज संस्थेद्वारे केली जात आहे.

एनएसईने या आदिवासी मुलांना साक्षरता आणि संख्यात्मक प्राविण्यासाठी चांगले शिक्षण प्राप्त करण्यास मदत केली आहे; शिवाय त्यांना क्रीडा, सार्वजनिक संभाषण, नृत्य आणि नाट्यकला इत्यादींशी संबंधित इतर कौशल्य विकसित करण्यास प्रोत्साहनदेखील दिले जात आहे.



कातकरी आदिवासींच्या मुलांसमवेत एनएसईचे कार्यकर्ते.

साताऱ्यात एनएसई राबवीत असलेल्या उपक्रमांना गमतीजमतींसह शिक्षण या संकल्पनेतून शिक्षण रंजन केंद्र आणि शिक्षण मित्र यांचे सहकार्य लाभले आहे.

या उपक्रमांमध्ये पथनाट्य, कळसुत्री बाहुल्यांचे खेळ, चित्रकथा यांच्या मदतीने तसेच जनजागरण यात्रांच्या माध्यमातून अध्ययन आणि क्रियाकलापांवर आधारीत शिक्षणाची विशेष पद्धत अनुसरली गेली आहे. यात शिक्षण मित्रांकडन विशेष भूमिका बजावली जात आहे. मुलांच्या शिक्षणात सकारात्मक बदल घडवून आणून त्यांच्यातील प्रतिभांचे पोषण करणारी, मुलांचा, पालकांचा आणि शाळांदरम्यान संवादाची दरी भरून काढणारी, शाळांच्या सहकार्याने काम करीत मुलांमधून शिक्षणाचे परिणामांना गती देण्यासाठी शिक्षण मित्र उत्प्रेरकाची भूमिका बजावत आहेत. प्रकल्पाच्या हस्तक्षेपांमुळे या वंचित मुलांना त्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी एक मंच प्रदान करण्यात आला आहे.